# गीत भागवत

[ सचित्र - मराठी ]

१८७०
म. ग्रं. सं. ठाणें.
विषय काव्य
सं. क्र. 2380
REFBK-0022511
REFBK-0022511



संतकवि :
श्री संत अच्युत महाराज
शिवभवन-श्री क्षेत्र कौंडण्यपूर ( विदर्भ )

किमत ) ( १ रुपया

धर्मग्रंथ प्रकाशन, शिवभवन-श्री क्षेत्र कौंडण्यपूर

श्री क्षेत्र कौंडण्यपूर येथील धर्मग्रंथ प्रकाशनाची

श्री संत अच्युत महाराज विरचित

## ★ धार्मिक पुस्तके ★

गीता, भागवत, सप्तशती, महाभारत,

संत कथा, सत्यनारायण कथा,

भजनमाला व तीर्थमहिमा इत्यादी पुस्तके खरेदी करून

धर्मग्रंथ प्रकाशनाला मदत करा.

—प्रकाशक

ॐ

जय-हरि !

श्री संत अच्युत महाराज विरचित

[ सचित्र-मराठी ]

# गीत भागवत

: लेखन :

पौष प्रतिपदा ते पौष पौर्णिमा शके १८९०
शिवभवन, श्रीक्षेत्र कौंडण्यपूर.

मराठी ग्रंथ संग्रहालय
2300
दा. क्र. 22599

REFBK-0022511
REFBK-0022511

किंमत ) ( १ रुपया

धर्मग्रंथ प्रकाशन, शिवभवन-श्रीक्षेत्र-कौंडण्यपूर

धर्मग्रंथ प्रकाशन, पुष्प १५ वे

प्रकाशक : **वि. गो. जोशी ( तिवसकर )**
धर्मग्रंथ प्रकाशन,
शिवभवन, श्री क्षेत्र कौंडण्यपूर,
ता. चांदूर रेल्वे, जि. अमरावती ( विदर्भ )

संत कवि : **श्री संत अच्युत महाराज**
शिवभवन-श्री क्षेत्र कौंडण्यपूर,

मुद्रक : **व. म. गुप्ते**
व्यवस्थापक : **वि. गो. जोशी ( तिवसकर )**
सुभाष मुद्रणालय,
तपोवन-अमरावती

**द्वितीय संस्करण**
प्रति : १५००

मुद्रण तिथी : **श्री क्षेत्र रेवसा महायात्रा**
शके १८९२

**मूल्य : १ रुपया**



ॐ

श्री सद्‌गुरु
राष्ट्रसंत
तुकडोजी
महाराज
गुरुकुंज
( विदर्भ )

यांच्या अमर स्मृतिस
गीत भागवत काव्य पुष्पांजलीचे
व्दितीय मुद्रण अत्यादराने समर्पण

श्री दत्तजयंती उत्सव
श्री क्षेत्र कौंडण्यपूर
शके १८९२

अच्युत

# अनुक्रमणिका


| विषय | लेखक |
|---|---|
| १) प्रकाशकाचे दोन शब्द | - वि. गो. जोशी ( तिवसकर ) |
| २) लेखकाचे निवेदन | - श्री संत अच्युत महाराज |
| ३) विश्वैकभक्तीचे भाग्य-प्रभाती | - |


## गीतानुक्रम


| अ. नं. | विषय | गीत |
|---|---|---|
| १) | भागवत निर्माण | गीत-भागवत, गणेश दर्शन |
| २) | अध्यात्म विचार | - प्रश्न परीक्षिती, शुका विचारी |
| ३) | मन्वन्तर रचना | - स्वायंभुव मनु तो पहिला |
| ४) | धृववंश विस्तार | - उत्तानपाद पुत्राला, वनवास |
| ५) | प्रियव्रत वंश | - प्रियव्रताचीये वंशी, वृषभाचा |
| ६) | संस्कार परिवर्तन | - भरत हरिण जाहला, द्वाड ऐशी |
| ७) | अवतार रहस्य | - सनकादिक जय विजया शापिती |
| ८) | सूर्यवंश | - मन्वन्तर वैवस्वत हे तो |
| ९) | पूर्व रामायण | - अयोध्येमध्ये राम जन्मुनी |
| १०) | उत्तर रामकथा | - अशोकवनी घे शोध मारुती |
| ११) | चंद्रवंश | - सुद्युम्न इलारूप झाला |
| १२) | श्रीकृष्ण पिता वसुदेव | - देवकी-वसुदेवाच्या पासुनी |
| १३) | श्रीकृष्ण जन्मकथा | - अवतरला श्रीकृष्ण तो |
| १४) | बालकृष्णलीला | - भरली यमुना दुभंग झाली |
| १५) | शक्तिमान श्रीकृष्ण | - उग्रसेना राज्य देई |

१६) गृहस्थ श्रीकृष्ण – धाम साजर कुंडिनपूर शोभलं
१७) नीतिमान श्रीकृष्ण – दंतवक्र शिशुपाल मारले
१८) गीतोपदेशक श्रीकृष्ण – द्रौपदीच्या हाकेशी, कृष्ण
१९) अनिवार दुर्दैव – परोपकारी, कृष्ण देशांतरी
२०) अजरामर श्रीकृष्ण – यादवांनी अन्नाची दारू पिवुनी
२१) भागवत गंगा – सप्ताह भागवताचा ऐकुनी
२२) अमरदर्शन – जन तांवरी हा कृष्ण जनार्दन

## श्री भागवत आराधना

अ. नं. विषय गीत

१) भागवताची आरती – भागवता ओवाळू आरती
२) नमन – नमस्कार नमस्कार
३) भजन – भागवता तव ऐकुनी ग्रंथा
४) भक्तिगीत – तुझे ध्यान जडो, पाय दृष्टि पडो
५) प्रार्थना श्लोक – ध्याता भागवतास हो सुहृदता
६) अंतिम शुभकामना – स्वातंत्र्य सौख्य आरोग्य, लाभो

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. 23८0
22591
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

# प्रकाशकाचे दोन शब्द

सद्भाविक वाचकांनो ?

श्री संत अच्युत महाराज विरचित गीत-भागवत शके अठराशे नव्वदमध्ये माघ वद्य दशमीस आम्ही छापून प्रसिद्ध केले. त्या आवृत्तीस गुरुदास साहित्यरत्न श्री. सुदाम सावरकर, श्रीमान सितारामजी हेडा, माननीय शिक्षक श्री. भास्करराव पोतदार, कीर्तनकेसरी श्री. करंदीकर महाराज आणि संतश्रेष्ठ श्री किसन महाराज खर्डेकर यांचे शुभचिंतनपर लेख मिळाले. आमचे प्रकाशन अशा साहित्यप्रेमळांचे सदैव ऋणी राहील.

गीत-भागवताची प्रथमावृत्ति त्वरीत लोकादरास पात्र झाली. त्यामुळे द्वितीय आवृत्तीचा हा शुभ योग आम्हास लाभलेला आहे. मागील पुस्तक मासिकाच्या आकाराचे होते. ते पुस्तक-पद्धतीचे व्हावे अशा सूचनेवरून द्वितीयावृत्ति आम्ही पुस्तकाचे आकारात छापत आहोत.

वंदनीय राष्ट्रसंताच्या चिरंतन महानिर्वाणानंतर शोकांजुलीत प्रकटलेले गीत-भागवत संत अच्युत महाराज यांनी श्रीगुरुचरणास श्रद्धेने वाहिलेले पुष्प होय. ते स्मृतिपुष्प जनता जनार्दनाच्या सेवेस सदैव तत्पर असावे अशी भगवंताला नम्र प्रार्थना आहे.

श्री संत अच्युत महाराज विरचित प्राकृत संतकथा, भजनमाला, भागवत, महाभारत व सप्तशती इत्यादी आम्ही मुद्रित केलेली पुस्तके भाविकांनी खरेदी करून अभ्यासावी. पुढील प्रकाशनास आम्हाला शुभ संधी द्यावी अशी धर्मग्रंथ वाचकांना आम्ही नम्र विनंती करतो.

प्रकाशक

**वि. गो. जोशी ( तिवसकर )**

मार्गशीर्ष शु. प्रतिपदा

शके १८९२

शिवभवन - श्री क्षेत्र कौंडण्यपूर

# लेखकाचे निवेदन

भक्तिधर्म प्रचाराच्या उद्देशाने अनेक धर्मग्रंथांचे लेखन करीत असतांना श्री महाभारताचे ओवीबद्ध लिखाण राष्ट्र-संताच्या शुभकामनेपासून मी सुरू केले.

नित्य प्रवास, कार्यक्रम व अनेक धर्मकार्यामधून मिळणाऱ्या वेळात सप्तशती, भागवत, गीता, संतचरित्रे, तीर्थ-महिमा, लेख व भजनमाला इत्यादी काव्यरचनेबरोबर महाभारताचे संपूर्ण लिखाण होतच आलेले होते.

नव्वद हजार ओवी लिहून झाल्या व महाभारताचा प्रथम खंड छापून रेवसा यात्रेत शके १८९० मध्ये राष्ट्रसंताच्या शुभहस्ते प्रकाशित झाला. वंदनीय महाराजांनी द्वितीय खंडास त्याचवेळी शुभकामना लिहून दिली. समर्थांच्या आशीर्वादाप्रमाणे तो दुसरा खंड छापून पूर्ण होण्याच्या बेतात होता.

हे सर्व वर्तमान ऋग्णशय्येवर पडलेल्या गुरुदेवास मी सांगि-तले होते. त्यांना अघोर दुःखाने वेढलेल्या अवस्थेत ' निश्चित रहा, लिखाण व प्रकाशन पूर्ण होईल ' असा मला पुन्हा न मिळू शकणारा शेवटचा दिलासा दुःखार्तस्वराने दिलेला होता.

या सर्व होऊ घातलेल्या साहित्याच्या पूर्ण साफल्यात विचित्र काळ ओढवला. आश्विन वद्य पंचमीला गुरुकुंजमध्ये संत तुकडोजी महाराज ब्रम्हविलीन झाले. संतप्रेमी महाराष्ट्र-जननी भाविकांच्या नेत्रांतून अश्रू ढाळू लागली. कितीही धीर धरून पाहिला तरी आग हृदयाला होरपळत होती.

राष्ट्रसंताने मला सांगितले होते की, ' मायावी लोका-सारखे शोक करू नये. आपण कर्तव्यतत्पर असावे. ' त्याप्रमाणे महापुरुषाच्या शोकाचे निखारे पोटी धरून महाभारताचे संपूर्ण लेखन मार्गशीर्ष पौर्णिमेस शके अठराशे नव्वदाच्या शुभ-तिथीवर पूर्ण झाले. हा संपूर्ण ग्रंथ प्राकृत ओवीबद्ध लिहिण्याला साडेतीन वर्षांचा अवधी लागला.

बालपणापासून माझ्या जीवनांतील प्रत्येक पारमार्थिक साफल्याची वार्ता सांगण्याचे केंद्रस्थान मला राष्ट्रसंत होते. रानावनाच्या वनवासी अवस्थेपासून कार्यकर्त्याच्या भूमिकेपर्यंत माझ्यावर दयेची नजर ठेवणारा तो पुण्यपुरुष या जन्माला तरी आता कायमचा अंतरला. या दुःखाच्या अग्नीत माझे मन सारखे तापत होते.

अशा संतप्त हृदयाला शांतीचा क्षण देणारे व कर्तव्याकडे लक्ष वळविणारे व्यास भागवताचे जे चिरंतन सार तेच हे गीत-भागवत होय.

भक्तिप्रधान भागवत हा मोठा ग्रंथ असून वाचन व त्याचा अभ्यास करण्याला बराच कालावधी लागतो. अल्पायुषी व दारिद्र्यग्रस्त अशा कलीतील मानवाकरिता धर्मग्रंथाचा विस्तारही थोडक्यात असावयाला पाहिजे. अल्पबुद्धि प्राण्याला ते कळू शकले पाहिजे. याच हेतूने मी माझी काव्याची लेखणी धर्मग्रंथाच्या पुनर्लेखनाकडे वळविलेली आहे.

इतर अनेक धर्मग्रंथाप्रमाणे भागवत कथासार गद्यातून लिहून झाले व ते मुद्रणाकडे वळलेले होते. बरेच दिवसापासून जनतेचा आग्रह होता की, भागवत ग्रंथावर ताल स्वरबद्ध गीतमाला आपण करून दिली तर बहुजन समाजाला ती भजने वेळोवेळी गावून रंजन व उपदेश दोन्हीही मिळतील. जनता-जनार्दनाच्या सेवेचा तोच हा शुभयोग होय.

दिवंगत राष्ट्रसंताच्या आठवणीत अश्रूने भरलेल्या कागदावर गुरुदेवाच्या चिरस्मृतीच्या स्फूर्तीने निर्माण होणाऱ्या गीत-भागवता ! तुझ्या गायनाने विश्वधर्म व विश्वशांतीचा सर्वत्र विस्तार होवो.

पौष पौर्णिमा शके १८९०
शिवभवन-श्रीक्षेत्र कौंडण्यपूर
( विदर्भ )

अच्युत

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 2360

श्री संत



# अच्युत महाराज

शिवभवन-श्री क्षेत्र कौंडण्यपूर ( विदर्भ )



श्री वृन्दावन बिहारी

# विश्वैकभक्तीचे भाग्य-
# भागवत भास्कर

धर्मग्रंथ ऐकणे हा कुळाचार किंवा शौक नसून तो ज्ञानप्राप्तीचा अभ्यास होय. जीवनतत्त्वांचा साक्षात्कार झाल्याशिवाय जन्माचे पूर्ण सार्थक होत नाही. प्रारब्ध, क्रियमाण, संचित व त्रिकालज्ञान हे दुर्बोध विषय समजल्याने जीवितोद्धारास मदत होते.

इतिहास, संस्कृति व उपदेश संग्रहीत करून वेदव्यासाने अठरा पुराणांची रचना केली. त्यात भागवत हा अज्ञानाचा अंधार दूर करणारा ज्ञानाचा भास्कर होय. त्यातून श्रीकृष्णाचे सद्दर्शन लाभते.

विश्वैकभक्तीचे भाग्य मिळविण्याला भागवतरूप सच्चरित्राच्या महासागराचे सदैव सेवन करावे.



मराठी ग्रंथ संग्रहाल
2380
दा. क्र. 225
ग्रंथ शाखा

# प्रभाती



(चाल– उठा गड्या अरुणोदय झाला)

अज्ञानाला दूर कराया, भागवताचा भास्कर हा ।
सद्दर्शन हे श्रीकृष्णाचे, सच्चरिताचा सिंधु महा ।।धृ।।

मूळ जगाचे जगदीशाचे, मानवतेचे दर्शन हे ।
ज्ञान भक्ति वैराग्य आत्मसुख, ब्रम्हाचे सोपानच हे ।।१।।

उद्‌भव जीवित विलय बोलिले, अफाट या संसाराचे ।
ब्रम्हावर्ती भारतवर्षी, दिग्दर्शन भारतभूचे ।।२।।

काळ ऋषिचा स्वर्गस्थांचा, भूदेवांचा उज्वल तो ।
सूत शौनका परीक्षितीसी शुक, कथा भागवत सांगे तो।। ३।।

दशावतारी कृष्ण मुरारी, नारायण हरि आळविला ।
अच्युत म्हणे श्री व्यासमुनीने, भक्तिमार्ग हा प्रकटविला।४।

# भागवत निर्माण

पाच हजार वर्षापूर्वी सत्यज्ञानाचा विसर पडून द्वापर युगाच्या शेवटी मोठे द्वंद्व माजले होते. तेव्हा धर्मोद्धारासाठी अवतरलेल्या थोर पुरुषांत पराशरपुत्र वेदव्यासाने सत्यज्ञानाचा प्रचार केला.

वेदोपनिषद, महाभारत व सतरा पुराणांचा महान लेखक श्रीकृष्णचरित्रपर भागवत लिहून पूर्णकाम झाला. व्यासकृत अठरावे पुराण तेच हे भागवत होय. व्यासपुत्र शुक अखंड ब्रम्हसमाधीत मग्न असूनही त्याने परोपकारासाठी भागवताचे अध्ययन केले. त्याला भागवत सांगण्यासाठी योग्य पात्र पाहिजे होते.

पांडववंशात अभिमन्युपुत्र परीक्षिती पांडवानंतर राजा झाला. ऋषिशापामुळे तो तक्षक डसून सात दिवसाने मरणार होता. शुकाने परीक्षितीचा अधिकार ओळखला व त्याला भेट दिली.

पारमार्थिक प्रश्नोत्तरांच्या निमित्ताने भागवत–सप्ताह तेथे सुरू झाला. व्यासाचे पूर्ण समाधान करणारे भागवत हे गणेश–दर्शन होय.

॥ जय श्रीकृष्ण ! ॥

# गीत भागवत

## गीत १

( चाल– मंगल दिन हा आज )

गीत– भागवत गणेश दर्शन ।
भावभक्तिचे शास्त्र चिरंतन ॥धृ॥

धुंधुकारी ऐकुनी तरला । दासिपुत्र नारद उद्धरला ।
समाधान झाले व्यासाला । भक्त पावती कृष्णपदाला
भागवताने लाभे जीवन ॥१॥

शृंगी शाप दे परीक्षितीसी । सात दिवस उरले मरणासी ।
व्यासपुत्र शुक ये भेटीसी । बैसे श्रवणी सप्ताहासी ।
नमो शारदा नर–नारायण ॥२॥

फिरता राजा कलिदमनाला । संगदोष घडलासे त्याला ।
मेला साप वाही साधूला । भरगे पडले परीक्षितीला ।
अच्युत म्हणे ते ऐका वर्णन ॥३॥

# अध्यात्म विचार

सर्वभूती आत्मा नीट कळला नाही म्हणून निर्दोष साधूच्या गळयात परीक्षितीने मेलेला सर्प टाकला. परिणामी मरण पदरात पडले. आता मरणाला सात दिवस राहिलेले पाहून व्यासपुत्र शुकाला त्याने अध्यात्मज्ञान विचारले.

शुक म्हणतो–जगाची उत्पत्ति, स्थिती व संहार हे सर्व अध्यात्मच होय. विराट विश्वरूप अध्यात्म कळावे व त्याची भक्ती जडावी याचसाठी दशलक्षणी भागवत निर्माण झाले आहे.

अध्यात्मज्ञानाने पूर्ण असा भागवत ग्रंथ शुक परीक्षितीस प्रश्नोत्तरार्थ सांगू लागला.

## गीत २

( चालः- ध्यान लगा, वैराग जगा )

प्रश्न परीक्षिती, शुका विचारी, कृष्णध्यान लावू कसे ?
गुज तरी काय असे ? ॥धृ॥

दयावंत शुक म्हणे–जगाचे मूळ पहावे आधी ।
तत्वज्ञान नसता दे पीडा, साधन आणि समाधी ।
भवसागरी या, ज्ञानच नौका, व्हावे पार असे ॥१॥
अनंत तत्वांच्या बीजातुनी, दशविध सृष्टी झाली ।
ब्रम्हा विष्णू शिव ही रूपे, काळाने धरली ।
कणाकणातुनी, जीवा जीवांतुनी, अनंत तो विलसे ॥२॥
'तप तप' बोध विधीसी झाला, चतुःश्लोक जे त्याचे ।
अठरा सहस्त्र श्लोक भागवत, त्यावरी मुनि व्यासाचे ।
दशलक्षणी ती कथा प्राकृती, अच्युत वर्णीतसे ॥३॥

❊ ❊ ❊

# मन्वन्तर रचना

जगात अगोदर कोण जन्मास आले ? मनुष्य कसा व केव्हांपासून उत्पन्न झाला ? हे वादग्रस्तप्रश्न प्राचीन इतिहास आठवून व्यासाने सोडविले.

स्वयंभू ब्रम्हाचा पुत्र स्वायंभुव हा पहिला मनु होय. तीन मुली व दोन मुले अशी त्याची संतान होती. मनुकन्या प्रसूतीची सति नावाची मुलगी शंकरास दिली. तसेच मनुपुत्री देवहुतीच्या मुलींची मुले दत्तात्रेय, कपिल इत्यादी ज्ञानावतार झाले.

ही मन्वन्तर रचना मैत्रेय विदुरास व सूत शौनकास परंपरेने सांगतात.

## गीत ३

( चालः—तुम्हारे पूजनको भगवान )

स्वायंभुव मनु तो पहिला । जनक मानव वंशाला ।।धृ।।

आधी एक राज्य विश्वाचे । ब्रम्हावर्त हे नाम जगाचे ।
दोन मुले मनुराजाला । तीन मुली अति गुणशीला ।।१।।

धृव आणि भरतवंश जे पुढती । याच मुलांच्या कुळी जन्मती ।
कश्यप भृगु दत्ता कपिला । प्रसविती पावन मनुबाला ।।२।।

कपिल ज्ञान दे देवहुतीसी । मैत्रेय सांगे ते विदुरासी ।
शौनक विचारी सूताला । अच्युत सांगे सुजनाला ।।३।।

# ध्रुववंश—विस्तार

धर्मनीति व मानवतेचा आदर्श असा स्वायंभुव मनु लोक-प्रसिद्ध झाला. त्याचा पुत्र उत्तानपाद होता. ध्रुव त्याचा मुलगा होय. तपाने अढळपद मिळविणाऱ्या ध्रुवाच्या वंशात पृथु-सारखे पृथ्वी दोहन करणारे सम्राट जन्मास आले.

पृथूच्या मुलाने इंद्रास जिंकले. याच वंशात प्राचीनबर्हीस नारदाने पुरंजनकथा सांगितली. प्रथम मन्वन्तरात शिवशापाने मेलेला दक्ष याच वंशात पुन्हा जन्मास येतो.

प्रचेतापुत्र त्या दक्षाच्या साठ मुली चंद्र व कश्यपादी योग्य पुरुषांच्या पत्नी झाल्या. त्यांच्या संतानापासून हे जग विस्तार पावत आहे.

## गीत ४

( चाल–विश्वासपे क्यों बैठा है ? )

उत्तानपादपुत्राला, वनवास ध्रुवाला घडला ।
सावत्र आयिच्यासाठी, वासुदेव नयनी दिसला ।।ध्रृ।।
जेथुनी कोणी ढकलू शकेना, पद ऐसे मिळवावे ।
सहा मास व्रत सुदृढ करतो, ध्रुव तो बालस्वभावे ।
पावला अढळपद योगी, निष्काम चित्त श्रीरंगी ।
अजरामर तो ध्रुव झाला, फळ ऐसे भक्तिरसाला ।।१।।
ध्रुववंशामध्ये वेन राक्षसी, राजा पृथु गुणशाली ।
जेणे पृथ्वीदोहन केले, जिंकली धरणी सगळी ।
पुढे प्राचिनर्बाहि नृपाला, दे नारद उपदेशाला ।
शिवशापे दक्ष जो मेला, तो याच कुळामध्ये आला ।।२।।
दक्षमुली सत्ताविस चंद्रा, दिल्या कश्यपा तेरा ।
कश्यपपुत्र जिंकी सूर्यासी, अशी ही संततिधारा ।
मनुवंशी प्रजा हे सारी, विस्तारली जगताभितरी ।
म्हणे अच्युत प्राचिन सृष्टि, असे कारण आज जगाला ।।३।।

# प्रियव्रतवंश

स्वायंभुव मनुचा दुसरा मुलगा प्रियव्रत होय. त्याचे वंशज सात द्विपांचे राजे होते. ऋषभ, भरत व सुदर्शनासारखे इह–परत्र यश पावणारे पुण्यात्मे या वंशांत उत्पन्न झाले.

उत्तम, तामस व रैवत हे मनु याच वंशातील नररत्ने होते. प्रथम एकच ब्रम्हसाम्राज्य होते. पुढे बरे वाईट कर्मामुळे स्वर्ग, नरक, आकाश, पाताळ व पृथ्वी असे भेद पडले.

एका जीवरूपी बीजाला अनेक कोटी जीवितांची फळे लागली तेच हे गतिमान विश्व होय.

## गीत ५

( चाल–मंडळाच्या प्रार्थनेला )

प्रियव्रताचीये वंशी, ऋषभाचा जन्म हो ! ।
नवपुत्र योगी त्याचे, भारताचे भाग्य हो ! ॥ धृ ॥

सर्व धरणी एक आधी, राज्य एका अनंताचे ।
सप्त सिंधु सप्त द्विप, पुढे भाग जगताचे ।
सुरासूर नांदती येथे, गंधर्वादि नाग हो ! ॥१॥

रसातळी पाताळी कुणी, स्वर्ग महर्लोकी ।
पुण्यबळे जाती स्वर्गा, पापी पडे नर्की ।
अजामीळ नाम जपता, होई विष्णुदूत हो ! ॥२॥

अजनाभ खंड आला, भरताचे हाती ।
भारताचे नाव तेव्हा, आले ब्रम्हावर्ती ।
सुदर्शन पुत्र त्याचा, जिंकी चंद्रलोक हो ! ॥३॥

भरताच्या वंशी गय, मरुत्त जन्मले ।
तामस रैवत मनु, उत्तम उपजले ।
अच्युत म्हणे विश्वी, भरले हे कूळ हो ! ॥४॥

* * *

# संस्कार परिवर्तन

भारतीय संस्कृति म्हणते की, प्राणी हा सर्वत्र सारखाच असतो. संस्काराप्रमाणे त्याला आकार मिळतात. जडभरत, हिरण्याक्ष-हिरण्यकश्यपु, प्रल्हाद, मरुदगण, बलि व वृत्रासुर इत्यादिकांच्या चरित्रावरून संस्काराचे महत्व कळून येते.

स्वर्ग, नर्क, बंधन व मोक्ष यांचा सांधा संस्कारच होय. पशु-पक्षी व वृक्षादी विविध योनींची जननी संस्काराला म्हणतात.

## गीत ६

ताल–दादरा ( चाल–हरीचे ध्यान लागो मना )

भरत हरिण जाहला द्वाड ऐसी वासना ।
जडभरत तोच पुढे, बोध देई रहुगणा ॥धृ॥

सांजवेळी दिति मागे, भोग कश्यपास जरी ।
हिरण्याक्ष कश्यपु सुत, जन्मती मग आसुरी ।
बीज फळतसे जनी, संस्कृति तशी साधना ॥१॥

कयाधु स्त्री कश्यपुसी, नारद संस्कारी तिला ।
प्रल्हादासम पोटी, भक्त थोर उपजला ।
बलि ज्याचा नातु दानी, दान देई वामना ॥२॥

दैत्यपुत्र होती दितीस, पण ती व्रताचार करी ।
मरुद्गण पोटी आले, पुण्य फळे भूवरी ।
वामनासी जन्म देई, अदिती दीन अंगना ॥३॥

चित्रकेतु भक्तिबळे, विद्याधर जाहला ।
वृत्रासुर तोच पापी, इंद्राने तो वधला ।
अच्युत म्हणे संस्कारच, स्वर्ग नर्क–साधना ॥४॥

# अवतार रहस्य

प्राचीन भारताचे संबंध वैकुंठादी लोकांशी प्रत्यक्ष असावेत, म्हणूनच सनकादी ऋषि विष्णुदर्शनासाठी वैकुंठास जात असत. एकदा तेथील द्वारपाळांनी त्यांच्या भावनेला दुखविले. तेव्हा मनुष्य इतका पवित्र होता की, त्यांनी विष्णुदूतास शाप दिला.

त्याचप्रमाणे तीन जन्म त्यांना राक्षस व्हावे लागले. ही वैकुंठपति श्रीहरीचीच अपकीर्ति होती. म्हणूनच सेवकांच्या उद्धारासाठी विष्णूने अवतार घेतले.

उत्पत्ति, विकास व संहार या सृष्टिक्रमाचे रक्षण व जगद्धर्माचे मार्गदर्शन यासाठी प्रसंगवत् भगवंताचे अवतार होतात.

अवतारांच्या कथा ऐकून सच्चरित्राकडे लक्ष द्यावयाचे असते.

गीत ७

( चाल–गावो रिध सिध. )

सनकादिक जय विजया शापिती
तीन जन्म ते राक्षस होती ।।धृ।।

हिरण्याक्ष कश्यपु जाहले । वराह नरसिंहाने वधले ।
रावण कुंभकर्ण ते झाले । श्रीरामाने त्यासी तारले ।
प्रल्हादादिक प्रकटले जगती ।।१।।

दंतवक्त्र शिशुपाल द्वापरी। होवुनी मातले तेच भूवरी ।
कृष्णरूप मग झालासे हरि। अठ्ठाविस युगे ऐसे तोवरी ।
पार्षद शापमुक्त ते होती ।।२।।

मागील युगी सत्यव्रत पावन। वैवस्वत तो मनु अर्वाचिन ।
मानववंश हे त्यांच्यापासुन। अफाट भूमिवरी विस्तारुन ।
अच्युत म्हणे मग विलया जाती ।।३।।

# सूर्यवंश

चतुर्युगीची एक चौकडी अशा एकाहत्तर चौकडयांचे एक मन्वन्तर होते. स्वायंभुव मन्वन्तरापासून चाक्षुष मन्वन्तरापर्यंत अशी सहा मन्वन्तरे झाली. सध्या सातवे वैवस्वत मन्वन्तर चालू आहे.



श्रीरामपंचायतन

कश्यपपुत्र विवस्वानाचा मुलगा वैवस्वत या मन्वन्तराचा मनु होय. त्याच्या सुद्युम्न नांवाच्या मुलापासून चंद्रवंश व इक्ष्वाकु पुत्रापासून सूर्यवंश विस्तार पावला. अनेक गुणकर्मामुळे क्षत्रिय ब्राम्हणादी वर्णभेद निर्माण झाले.

मांधाता, भगीरथ, दिलीप, रघु, अज व दशरथ यासारख्या सम्राटांची वंशावळ कौसल्यानंदन रामाने प्रसिद्धीस आणली व सूर्यवंश अजरामर केला.

## गीत ८

( चाल–राधा गौळण करिते )

मन्वन्तर वैवस्वत हे तो ।
सूर्यवंश इथे प्रकट दिसे तो ॥धृ॥

वैवस्वत करी थोर तपाला ।
इक्ष्वाकुसम पुत्र तयाला ।
राम ज्याचिया वंशि जन्मला ।
सूर्यवंश तो जगा तारतो ॥१॥

मांधाता मुचकुंद भगीरथ ।
हरिश्चंद्र सगरादि प्रकटत ।
अश्मक सौदासादि जीवित ।
या वंशी ऋतुपर्ण जन्मतो ॥२॥

रघु खट्वांग अजाच्या वंशी
राम पुत्र दशरथ राजासी ।
चरित्र ज्याचे तारी जगासी ।
अच्युत रामकथानक गातो ॥३॥

# पूर्व रामायण

श्रीराम सूर्यवंशात जन्मास आला. आईबापाची तपश्चर्या रामरुपाने साकार झाली. बालपणी गौतमीचा उद्धार करणारा राम लक्ष्मीरूप सीतेचा पति झाला.

सावत्र आईच्या वराचे निमित्त करून तो चौदा वर्षे वनात गेला. रावण कुंभकर्णरूप जय विजयाला त्याने लंकानाश करून सद्‌गतीस नेले.

शबरीची उष्टी बोरे खाणारा राम वानराशी मैत्री करतो. कपिसेना लंकेत नेण्यासाठी समुद्रावर दगडांचा पूल बांधतो.

पूर्व रामायण दगडी मनालाही परोपकार व कर्तव्याची दिक्षा देईल.

## गीत ९

( चाल–गोरी गोरी पान )

अयोध्येमध्ये राम जन्मुनी
रामराज्य विस्तारी मेदिनी ।।धृ।।

शिळा अहिल्या केली पावन ।
जनकपुत्री सीतेसी पर्णुन ।
कैकयिसाठी जाई तो वनी ।।१।।

सीतेस रावण चोरुनी नेता ।
भेटे राघव कपि हनुमंता ।
शबरीची बोरे गोड करोनी ।।२।।

दगडाचा पुल सिंधूवरती ।
पूर्व रामायणी कथा थोर ती ।
अच्युत म्हणे घ्या बोध यातुनी ।।३।।



# उत्तर रामकथा

हनुमंताने समुद्र लंघून सीतेचा शोध केला. दुर्बल मनुष्यांना राक्षस फाडून खात होते. म्हणून रामाने वानरदळे उभी केली. रावणाचा बंधू बिभीषण भक्तीने रामास शरण आला. रामाने त्याला चिरंजीवपद व लंकेचे राज्य दिले.

रावणनाश, सावत्र बंधू भरताचे प्रेम, सीतेने घेतलेले अग्निदिव्य, पुन्हा गर्भिणी सीतेस वनात पाठविणे, लव-कुशाची उत्पत्ति, राजपुत्रावर वाल्मिकी मुनीचे संस्कार, रामराज्याचे सौख्य, रामायणकालीन मानवता व रामनामाचे महत्व हे उत्तर रामकथेचे स्वारस्य होय.

## गीत १०

(चाल – संतानो ! या, साधुंनो ! )

अशोकवनी घे शोध मारुती ।
कपि घेवुनी मग चाले रघुपति ॥धृ०॥

रावण कुंभकर्ण दैत्यासी ।
राम मारी अहिमही असुराशी
भक्त बिभिषणा तारी रघुपति ॥१॥

अग्निदिव्य सति सीता घेतसे ।
रामराज्य भारत भोगतसे ।
बंधू भरता भेटे रघुपति । ॥२॥

लवकुश सीतेची ती बाळे ।
रामकथानक गाती रसाळे ।
वाल्मिकिचे ब्रिद राखी रघुपति ॥३॥

राम शब्द जरी राही मुखाला ।
तरी उद्धार मिळे पाप्याला ।
अच्युत म्हणे घ्यावा रघुपति ॥४॥

# चंद्रवंश



## भगवान श्रीविष्णु

वैवस्वतपुत्र सुद्युम्न शापाने स्त्रीरूप झाला. या अवस्थेत बुधाशी लग्न लागून पुरुरवा जन्मास आला. त्याने उर्वशीसी लग्न केले. तिला आयु, श्रुतायु इत्यादी सहा मुले झालीत.

श्रुतायुच्या वंशात विश्वामित्र व परशुरामासारखे तापसी रणधीर वीर जन्मास आले. आयुच्या वंशात नहुष, ययाति, यदु, पुरु, दुष्यंत व भरत यासारखे सुप्रसिद्ध राजे महान यशस्वी ठरले.

ययातिपुत्र यदुराजाचे कुळ तारण्याला श्रीविष्णूचा कृष्णावतार याच वंशात झाला. भारत देशाचे नाव सूर्यवंशाप्रमाणे चंद्रवंशीय सम्राटांनीही प्रसिद्धीस आणले.

## गीत ११

(तुम आज मेरे संग)

सुद्युम्न इलारूप झाला, चंद्राच्या पुत्र बुधाला ।
पति मानुनी दे तो रतिला, चंद्रवंश म्हणतो याला ॥धृ.॥

पुत्र श्रृतायु पुरुरव्यासी । विश्वामित्र परशुरामासी ।
प्रसवी ते कुळ शूरविरासी । जिंकीतसे स्वर्गाला ॥१॥

आयुपुत्र नहुषास ययाति । देवयानि शर्मिष्ठेचा पति ।
यदु अनु द्रुहयु तुर्वसु त्याप्रती । पुत्र पुरु नृप झाला ॥२॥

पुरु पुत्रासी राज्य मिळाले । रंतिभार दुष्यंत प्रकटले ।
भरताने ते कुळ शोभविले । यशस्वी भारत झाला ॥३॥

इतिहासाचे जीवन घडले । म्हणुनी भारत नाम हे पडले ।
अच्युत म्हणे पुढे चंद्रवंशी । श्रीविष्णु अवतरला ॥४॥

# श्रीकृष्णपिता-वसुदेव



गोपालकृष्ण

चंद्रवंशातील हत्ती राजाने हस्तिनापूर वसविले. विदर्भादी घराणे वाढीस लागली. कुरु, जन्हु, प्रतिप व शांतनु या राजांच्या कुळात भीष्म, धृतराष्ट्र व पांडु यांच्या पिढीनंतर कौरव व पांडव जन्मास आले.

याच राजवंशात म्लेंच्छ, शक, यवन व बर्बरादि जाति गुणकर्माने निर्माण झाल्या. जन्मजन्मांतरी विष्णूचे सौख्य भोगावे व तो आपला मुलगा असावा—असे इच्छिणारा देवकी पति वसुदेव याच घराण्यांत शूरसेनाचा पुत्र झाला.

यदु, कार्तवीर्यार्जुन, क्रोष्टु व शूरसेनादिकांचे हे यादव घराणे उद्धारणारा श्रीकृष्ण वसुदेवाचा पुत्र होय. श्रीविष्णूने तो अवतार धर्मोद्धारासाठी घेतला.

## गीत १२

( चाल- या जगात कोणी नाही )

देवकि वसुदेवाच्यापासुनी, चंद्रवंशी
श्रीकृष्ण तो अवतरला ।
धर्माची दुर्गति पाहुनी, महाविष्णु
परमेश्वर तो अवतरला ।।धृ।।

यदुसी शाप ययातीचा । आराधक तो दत्ताचा ।
त्याचा वंशोध्दार कराया, । देवकिनंदन अवतरला।।१।।

अजमिढवंशी कौरव-पांडव। त्यांचे चालले युद्ध-तांडव ।
सज्जन त्रस्त जाहले म्हणोनी । दैत्यनिकंदन अवतरला ।।२।।

शक बर्बर म्लेंच्छादिक जाती। अनेक राजे उगिच भांडती।
अच्युत म्हणे त्यांना बोधाया । गीताप्रेरक अवतरला।।३।।

# श्रीकृष्ण-जन्मकथा



श्री अंबिकादेवी

कोणताही प्राणी कर्मधर्माचा व्यापारी आहे. अवतारी पुरुषांचे जन्मही याच न्यायाने होत असतात. देवकीच्या मुलांचा नाश होणे, तिचा सातवा गर्भ गळून तो रोहिणीचे पोटी जाणे या प्रसंगात थोर कर्मच दिसते.

मथुरेत कंसाच्या कैदेत देवकीला आठवा पुत्र झाला तोच भगवान श्रीकृष्ण होय. त्याचे कृपेने जीवन सार्थकी लागावे म्हणून अनेक सिद्ध साधक, देव, दानव व मानव मृत्युलोकी जन्मास आले.

अंतरंग ज्ञानाच्या दृष्टीने श्रीकृष्ण-जन्मकथा अभ्यासावी व सत्यज्ञान मिळवावे.

## गीत १३

( चाल–सीधा कौन तेढा कौन )

अवतरला श्रीकृष्ण तो, भक्तोद्धार कराया ।
पूर्वार्जित पाहोनिया, सर्वांसी फळ द्याया ।।धृ।।

कालनेमि खळ कंस तो, इच्छी उद्धारासी ।
देव दैत्य जे जन्मले, तारी तया हृषिकेशी ।
ज्येष्ठ बंधु बलराम तो, सेवी प्रभुच्या पाया ।।१।।

देवकि-वसुदेवाने, केले असे तप भारी ।
पुत्र आठवा श्रीहरि, आला त्यांच्या उदरी ।
भोज वृष्णि अंधक मधु, वंश हे उद्धाराया ।।२।।

श्रावण वद्य अष्टमी, अर्धरात्रि मथुरेसी ।
कैदेमध्ये कंसाच्या, झाला जन्म हरीसी ।
अच्युत जोडुनी हाता, गाती गीत यदुराया ।।३।।

# बालपण लीला



कंसाच्या कैदेत देवकीपुत्र जन्मास आला. त्याचे हातून महान लोकहित होणार होते म्हणूनच तुरुंगाचे द्वार उघडले. यमुनेने वसुदेवाला वाट दिली व श्रीकृष्णास गोकुळात पोहोचविता आले.

याच वेळेवर यशोदेस मुलगी झाली होती. तीच उचलून वसुदेव मथुरेस परत आला. त्या मुलीला श्रीकृष्ण समजून कंसाने दगडावर आपटले. ती कंसाला सावध करून अमर देवता झाली.

गोकुळात श्रीकृष्णाचा वडीलभाऊ बलराम, मनमोहन श्रीकृष्ण अनेक बाललीला करू लागले. गोपाल वेषधारी श्रीकृष्णाची बासरी त्रिलोकात निनादू लागली. ब्रम्हा व इंद्रादी त्याला शरण आले.

पूतना, तृण, बक, अघ, धेनुक व वत्स इत्यादी असुरांचा नाश करणाऱ्या श्रीकृष्णाने दिव्य रासलीला करून मथुरेत कंसाचाही नाश केला.

## गीत १४

( चाल–सुख शोधविती )

भरली यमुना दुभंग झाली, वाट खुली होतसे ।
गोकुळीं वनमाली येतसे ॥धृ॥

कृष्ण जन्मता तुटल्या बेडया, माय बाप सुखी झाले ।
गोकुळी ठेवुनी पुत्र आपुला, मुलीस उचलीतसे ॥१॥

नंदपुत्रीसी कंस आपटी, बोले ती जगदंबा– ।
'वैरि जन्मला रहा तू सावध,' पापी कंस भीतसे ॥२॥

पुतना तृण बक शकट अरिष्टा, मारिले केशी वत्सा ।
अघासुरवध कालियामर्दन लीला दावितसे ॥३॥

यज्ञपत्नीसी दे सद्दर्शन, गोवर्धन धरी हाती ।
गाई चारी वाजवी बासुरी, रास भरवीतसे ॥४॥

कंसा मारुनी वसुदेवाला, कृष्ण पुन्हा भेटला ।
अच्युत म्हणे ब्रम्हादिक वंदिती, इंद्र शरण येतसे ॥५॥



# शक्तिमान श्रीकृष्ण

गोकुळच्या लोकांशी प्रेम करणारा श्रीकृष्ण गाई चारतो. स्नेहाचे लोणी खातो व ते व्यायाम करून पचवितो. बलवान कंसाला एका बुक्कीने सहज ठार करणारा श्रीकृष्ण आपले विद्यार्थी वय जाणून उज्जयनीस सांदिपनीच्या शाळेत शिक्षण घेतो.

उग्रसेनास राज्य देवून जरासंध व कालयवन इत्यादी बलवान सम्राटाशी श्रीकृष्णाने तोंड दिले. भारताच्या पश्चिमेस समुद्र हटवून सुदृढ द्वारका वसविली.

कंसाची दासी कुब्जा त्याने उद्धारली. कंसाचा मंत्री अक्रूर श्रीकृष्णाचा भक्त होता. ठार मारलेल्या कंसाचा वडील उग्रसेन श्रीकृष्णाच्या तंत्राने राज्य चालवीत असे.

श्रीकृष्ण म्हणजे शक्तिदेवता असे सर्वत्र ओळखू लागले.

## गीत १५

( चाल–स्वस्थ का बा ! भारता )

उग्रसेना राज्य देई, कृष्ण निस्पृह देवता ।
उद्धरी कुब्जेस तो, अक्रुरासी ज्ञानदाता ॥धृ॥

नंद आणि ती यशोदा, प्रेमसुख उपभोगिती ।
गोप गोपी घेती दर्शन, धन्य मानिती जीविता ॥१॥

गोधने चारोनिया, दूध लोणी खातसे ।
ठार मारी सहजभावे, चाणुरादि शक्तिवंता ॥२॥

दुष्ट म्हणुनी कंस मामा, मारला नीतिबळे ।
ज्ञानी असुनी शिकतसे हरि, सांदिपनीची संहिता ॥३॥

जरासंधा कालयवना, पराभवी श्रीकृष्ण तो ।
सागरी रची द्वारका, तारी प्रभू तो अच्युता ॥४



# गृहस्थ श्रीकृष्ण

श्रीकृष्णाची कीर्ति त्रिलोकात पसरली. लक्ष्मीरुप रुक्मिणी श्रीकृष्णास वश झाली. पूर्व जन्मांतील कर्मयोगाच्या संबंधित स्त्रिया सोळा हजार एकशे आठ श्रीकृष्णाच्या धर्मपत्न्या झाल्या.

प्रत्येक स्त्रीस दहा मुले व एक मुलगी याप्रमाणे सर्व स्त्रियांना संतान झाले. आता द्वारका भू-वैकुंठाप्रमाणे विस्तारली.

नारदास झालेली स्त्रीची आसक्ति अयोग्य ठरवून अचूकपणे ज्ञाता श्रीकृष्ण ती दूर करतो. गरीब मित्र सुदामास सौख्य देतो.

गृहस्थांनी, अशा गृहस्थ असून निरासक्त व ज्ञानसागर श्रीकृष्णाचा आदर्श घ्यावा.

## गीत १६

( चाल–माझ्या गावाचे मंदीर )

धाम साजरं कुंडिनपूर शोभलं ।
रुक्मिणीत कृष्णाचं मन बसलं ॥धृ॥

सोडुनी शिशुपालाचे वैभव। रुक्मिणी वरी कृष्ण यादव।
सत्यभामा भद्रा रेखिव। सस्या जांबवतीची राणीव।
मित्रविंदा कालिंदीन वरलं ॥१॥
वधुनी भौमासुरास समरी। सोळा सहस्र एक शत नारी ।
भोगतसे द्वारकाविहारी। गृहस्थीची फुलबाग साजरी।
द्वारकेसी स्वर्गसुख लाजलं ॥२॥

प्रत्येक स्त्रियेच्या पोटी। मुले दहा एक कन्या ती।
नारदा जडली आसक्ति। प्रभू दूर करी सर्वच ती।
सुदामासी मित्रसुख दिधलं ॥३॥

प्रद्युम्न अनिरुद्धाला। सुख साम्बादि पुत्राला।
कैवारी दीनजनाला। असा हा कृष्ण माननीय ठरला।
म्हणे अच्युत त्यानं जग तारलं ॥४॥

# नीतिमान श्रीकृष्ण

श्रीकृष्णाची गृहस्थीभावना विश्वव्यापी होती. बलशाली जरासंधास युक्तीने मारून त्याने सहस्रो राजे लोकांना दुःख-मुक्त केले. शिशुपाल व दंतवक्त्र या वैकुंठातील विष्णुदूतांचा श्रीकृष्णाने उद्धार केला.

भीष्म, द्रोण, धृतराष्ट्र व विदुरासारखे थोर पुरुष हजर असून महाराणी द्रौपदीची कौरवांनी भर दरबारात विटंबना केली. धार्मिक व कृष्णभक्त म्हणविणारे पांडव जूवा खेळतात व स्त्रिलासुद्धा पणास लावतात. यादव लोक आप्त म्हणवून सज्जनांचा अपमान करतात व श्रीकृष्णाचे धार्मिक हृदय दुखवितात.

अशा अनेक अन्यायामुळेच श्रीकृष्णाने युद्धप्रसंग घडवून आणला व नीतिरक्षणासाठी अनीतिरूप भू-भाराचा संहार केला.

## गीत १७

( चाल–अवताराचे कार्य कराया )

दंतवक्त्र शिशुपाल मारले, शापातुनी पार्षद सोडविले।
श्रीकृष्णाने मारुनी दूर्जन, सज्जन पांडव रक्षियले ॥धृ॥

जरासंध मारुनी भीमाने, कैदी राजे सोडविले।
कौरव दुष्ट ते आप्त तरी, श्रीकृष्णाने नाशविले ॥१॥

भक्त पांडव द्यूत खेळुनी, भोगती दुःखे वनवासा।
श्रीकृष्णाला दया न त्यांची, फळ पापाचे चाखविले ॥२॥

गोपालाने गोकालासी, भूभारासी मारियले।
अच्युत म्हणे खळ आप्त यादवा, प्रभुने प्रभासी नाशविले
॥३॥

# गीतोपद्देशक श्रीकृष्ण

अनाथ द्रौपदीची वस्त्रे पुरवून लाज राखणारा श्रीकृष्ण अर्जुनाचा सारथी झाला. ऐन वेळेवर रणामध्ये पार्थास भ्रमाने पछाडले. तेव्हा श्रीकृष्णार्जुनाचा संवाद म्हणजे अज्ञानाची व ज्ञानाची लढाईच सुरू झाली. अर्जुनाने स्वतःला पंडीत समजून क्लिष्ट प्रश्न केले.

श्रीकृष्णाने निष्काम कर्तव्य कर्माचा बोध दिला. योगाभ्यास, आहारशुद्धि, सात्विक विहार व सत्यज्ञान विचार यांच्याद्वारे आत्मतत्वाभ्यासाचे मार्गदर्शन केले. स्वभावपरवश होवून कामे करण्यापेक्षा सारासार विचारांची महति सांगितली.

स्वधर्मासाठी हृदयविहारी परमेश्वराचे अधिष्ठान असावे. ईश्वरीप्रसाद ही मानवतेची पूर्णता होय. या पूर्वपरंपराप्राप्त गीताज्ञानाचा उज्वल प्रकाश दाखवून श्रीकृष्णाने अर्जुनास कर्तव्यतत्पर केले.

गीतोपदेश हा श्रीकृष्णचारित्र्याचा कळस होय.

गीत १८

(चाल–प्यारा हिंदुस्थान है)

द्रौपदीच्या हाकेसी, कृष्णप्रभू धावला ।
पार्थासी गीता सांगे, रणी धर्म जिंकला ॥धृ॥

स्वधर्मासी सोडू नये, परधर्मा जोडू नये ।
कीर्तीला खंडू नये, ज्ञान ऐसे बोलला ॥१॥

सर्वाभती एक हरि, मरणारा कोण तरी ? ।
षड्‌रिपूसी जिंकता, मोक्ष लाभ थोरला ॥२॥

सभ्यतेने चालता, स्वर्गसौख्य होतसे ।
योगदृष्टि साधता, द्वैतवाद खुंटला ॥३॥

धृतराष्ट्रासी संजय, प्रसंग हा सांगतसे ।
अच्युत म्हणे गीतेने, धर्म राज्य पावला ॥४॥

# अनिवार दुर्दैव

प्रारब्धाने कोणालाच सोडले नाही. श्रीकृष्ण लोकोपकारात तल्लीन राहत असे. त्याने देवकी मातेला तिची मेलेली सहा बाळे सूतल लोकांतून आणून पुन्हा दाखविली. एका गृहस्थाची मेलेली नव मुले श्रीकृष्ण नारायणाच्या लोकांतून आणून दाखवितो. उद्धवास अपूर्व भक्तिज्ञान देतो.

अशा समर्थ श्रीकृष्णाला दुर्दैवाने घेरले. श्रीकृष्णाच्या आप्तवर्गांनी सत्पुरुषांचा अपमान केला. त्यामुळे श्रीकृष्णासहित सर्व यादव नाश पावले.



श्री दत्तात्रेय

उत्तरेच्या पोटातील गर्भाचे रक्षण करून परीक्षितीस जन्म देणारा श्रीकृष्ण आपल्या वंशाचा नाश डोळ्यासमोर पाहतो. सुदामास सुवर्णपुरी देणाऱ्या श्रीकृष्णाची मुले व स्त्रिया अनाथ रानोमाळ भटकतात व त्यांना डाकेखोर लुटतात.

स्वर्गापेक्षाही शोभिवंत व यमपुरीहून सुदृढ द्वारका पाण्यात बुडते असे अनिवार दुर्दैव श्रीकृष्णाच्या चारित्र्यातही दिसून येते.

## गीत १९

(चाल–छंद मनाचा, आनंद गुणाचा)

परोपकारी, कृष्ण देशांतरी, यादव मातले नच आवरती ॥धृ॥

उत्तरेच्या पोटी अस्त्र वैरियांचे, कृष्णाने केले पाणी तयाचे ।
बाळ परीक्षिति जन्मासी आला,
राखीतसे जो कुळ पांडवांचे ।
देवकिची बाळे, दावी तिज डोळा,
तरी यादवांना गर्व बहु पोटी ॥१॥

नवयोगि देती वसुदेवा बोध, तुझा पुत्र कृष्ण परब्रम्ह थोर ।
कृष्णदर्शनाला येई हनुमंत, महिमा कृष्णाची अशी ही अपार ।
तरी सांब लुगडे नेसुनी नाचे,
मुसळ उपजले विनाशाचे पोटी ॥२॥

उद्धवाची भक्ति अंतरापासोनी,
भेटला एकांती करी विनवणी ।
दत्ताचा उपदेश गुरुमार्गज्ञान,
कृष्ण सांगे त्याला समज देवोनी ।
पुढे कलीयुगी, नाम हेच सार,
भक्तिनौकेतुनी जन उद्धरती ॥३॥

नारायणापासुनी आणि नव बाळे,
ऐसी कृष्णाची अद्‌भूत शक्ति ।
तो यादवासी सांगे–धुवा पापे,
ना तरी नर्क वाजेल हो माथी ।
अच्युता ते यादव तरी मत्त झाले,
घेरलियाकाळ ऐसी पडे भ्रांति ॥४॥

# अजरामर श्रीकृष्ण

यादव पापामुळे आपसात लढून नाश पावले. पूर्व जन्माचा वाली जराव्याध होवून श्रीकृष्णाच्या चरणास बाण मारतो. समदृष्टी व ज्ञाता श्रीकृष्ण व्याधास सद्‌गती देतो.

बंधु बलराम मरण पावला असे पाहून विश्वोपकारी श्रीकृष्ण आत्मचिंतन करीत विराट अव्यक्तात विलीन होतो. शंकराचे हृद्‌गत व श्रीविष्णूचे पूर्णत्व असा पूर्ण पुरुष वसुदेवपुत्र श्रीकृष्ण आजही जगदाकाराने भक्तांना आनंद देत आहे.

सच्चिदानंद आत्माराम तोच अजरामर श्रीकृष्ण होय. श्रीकृष्णकथेच्या निमित्ताने आत्म्याचे अमरत्व ऐकून सत्यज्ञान प्रकाश झाला. भागवत ऐकून पावन झालेल्या परीक्षितीची मरणाची भीति दूर झाली व त्याला धर्य आले.

## गीत २०


ताल:-दादरा (चाल-ऐहसान मेरे दिलपे)

यादवांनी अन्नाची दारू पिवुनी ।
नाशविला वंश आपसात लढोनी ।।धृ.।।

काळ नेत्री भरला मग शस्त्र उचलती ।
कृष्णाला मारावया बाण सोडती ।
असंख्यात ठार होती वीर ते रणी ।।१।।

बळराम मरता प्रभू ध्यान लावितो ।
जराव्याध बाण त्याच्या पायी मारतो ।
पूर्व जन्मीचा वालि तो तारला झणि ।।२।।

परंधामी कृष्ण जाई उधळली फुले ।
द्वारका जळात बुडे वाचली मुले ।
अच्युत म्हणे धीर देई पार्थ येवुनी ।।३।।



# भागवत गंगा

परीक्षितीने सप्ताह भागवत ऐकले. शुकमुखातून पाझरलेली ही अमृतधार ग्रंथाच्या रूपाने जगाला पावन करीत आहे. बारा स्कंध अठरा सहस्र श्लोकांचे व्यास भागवत पूर्वसंस्कृति व मानवोद्धाराचे साक्षात्कारी शास्त्र होय.

ते भागवत विदर्भातील श्रीक्षेत्र कौंडण्यपूर येथे संतपदरज अच्युताने मराठी ओवीबद्ध भागवत लिहिले. गीता, सप्तशती, तीर्थमहिमा, संत-चरित्रे, भजनमाला व संपूर्ण महाभारतादी धर्म ग्रंथ लिहून जनसेवेस अर्पण करणारा तोच अच्युत होय.

पूजनीय राष्ट्रसंत ब्रम्हविलीन झाल्यावर अच्युताने गुरुदेवांच्या अमरस्मृतीस हे गीत-भागवत अमृतकाव्य वाहिलेले आहे. भागवत हा विश्वशांतीचा तारक मंत्रच होय.

भागवत-गंगेचे सच्चरित्र-जल सर्वांना पावन करील.

## गीत २१

छंद, (चाल– हरीका नाम सुमिरन प्यारे )

सप्ताह भागवताचा ऐकुनी, परीक्षिती तरला ।
शुकमुखाचा अमृतपाझर, भूवरती उरला ।।धृ।।

नैमिषवनी सूत शौनका, सनक नारदाला ।
भागवताचा ग्रंथ सांगती, देव त्रिलोकाला ।।१।।

पूर्वसंस्कृति मानवनिर्मिति, भूत भविष्याला ।
मार्कंडेय ऋषीची गाथा, येथे बोधाला ।।२।।

विश्वरूप श्रीकृष्णदर्शना, ग्रंथ लोकी झाला ।
द्वादश स्कंधी सहस्त्र अठरा, श्लोकांची माला ।।३।।

भागवताची गंगा वाहे, यावे स्नानाला ।
विश्वशांतीचा मंत्र भागवत, तारी अच्युताला ।।४।।

# अमरदर्शन भागवत



श्रीकृष्ण परंधामास गेला व द्वारका पाण्यात बुडाली. स्त्रिया आणि राहिलेली प्रजा असहाय्य झाली पण त्या शोकाचे कारण अज्ञानच होते. जीवन व मरण हे सर्वांना लागलेले कालसूत्रच होय.

खरे पाहिले चरित्रशून्यता हेच मरण व सच्चरित्र हेच अमरपद होय. चरित्र दाता श्रीकृष्ण गेलाच कुठे ? त्याच्या आठवणीत यादवांना पुनरुज्जीवन मिळाले.

मृतभावनेस जागविणारे भागवत अमरदर्शनाचे कर्तव्य अव्याहत गतीने करीत आहे. राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज शके अठराशे नव्वदाच्या आश्विन वद्य पंचमीस गुरुकुंज आश्रमात ब्रम्हविलीन झाले. हा त्यांच्या मृत्यूचा सर्वांनाच जबरदस्त धक्का बसला. जो तो निराशेने राहू लागला.

सद्गुरुपदाची आस वाहणारा माझाही जीव वियोगाने व्यथित होता. ती व्यथा शांत करणारे गीत–भागवत हे अमरदर्शन होय.

पंचतत्त्वाचे शरीर पडले तरी गुरुदेवाचा परोपकार अमर असल्यामुळे शोकापेक्षा कर्तव्य करणे उत्तम हा व्यास भागवताचा मथितार्थ भजनी गीत–भागवतातून उदयास आला.

अमरदर्शन भागवता ! आम्हाला तुझ्या गीत–भागवताने अमर चरित्र साधता यावे.

## गीत २२

राग–भैरवी (चाल–वर दे इतुका)

जन तोवरी हा कृष्ण जनार्दन ।
भागवताचे हे सार चिरंतन ॥धृ॥

बुडली द्वारका उरल्या नारी । फिरती बाळे यमुनातीरी ।
पाहुनी उद्धव भक्त समोरी । यादव रडती कोण सावरी ।
भागवताने लाभे जीवन ॥१॥

काया–मंदीर जीव–पुजारी । देही तैसा जगात श्रीहरि ।
सदा राहावे परोपकारी । दूर नसे मग तो गिरिधारी ।
काम करावे नाम आठवून ॥२॥

सत्पुरुषांचा प्राण भागवत । श्रीकृष्णाचे रुप भागवत ।
व्यासाचा मथितार्थ भागवत । जगदोद्धारा ग्रंथ भागवत ।
मंगल गीत–भागवत गायन ॥३॥

राष्ट्रसंत गुरुदेव आम्हाला । सोडुनी गेला कृष्णपदाला ।
भागवताच्या ज्ञाने कळला । संत तो अमर न आला गेला ।
अच्युत गुरुरुप पाही त्रिभुवन ॥४॥

# ❋ भागवताची आरती ❋

(चाल–संतांनो ! या, साधुनो ! या )

भागवता ओवाळू आरती । श्रीकृष्णाची मंगल मूर्ति ।।धृ।।
परीक्षिती–शुक संवादातुनी । शौनक–सूत हरीचर्चेतुनी ।
व्यास ऋषिची निर्मल स्फूर्ति । भागवता ।।१।।
अफाट जग हे कैसे झाले । जनार्दनाने सर्व व्यापले ।
ज्ञानाची या तू शुभज्योति । भागवता ।।२।।
मरणे जगणे जीवनलीला । उगा खेळ हा स्वप्नामधला
पहिले माती शेवट माती । भागवता ।।३।।
भक्ति ज्ञान विरक्ति संथा । ग्रंथरूप तारक भगवंता ।
अच्युत वंदुनी गातो कीर्ति । भागवता ।।४।।

## ❋ नमन ❋

नमस्कार नमस्कार । मी पातकी भूमिभार ।
तू देव करुणासागर । रक्षावे परमेश्वरा ।।

## ❋ भजन ❋ ( चाल–कसा निभवशी काळ )

भागवता; तव ऐकुनी ग्रंथा, ग्रंथि तुटो हृदयाची ।
वाट मिळो भक्तीची आम्हा, प्रीति जडोप रमेशाची ।।धृ।
आमुच्या देही आत्मा भरला, तोच दिसो सर्वाठायी ।
दया क्षमा शील सद्‌गुण सारे, उपजावे अमुचे देही।।१।।
काम क्रोध मद मत्सर जावे, दंभ लोभ हे विलयाशी ।
अमुच्या हृदयाचे मंदिर हो, वास कराया प्रभु तुजशी।।२।।
पाप ताप संताप निवारी, ज्ञान तुझे चित्ती वसु दे ।
अच्युत वंदन करीत भावे, नयनी कृष्ण सखा दिसु दे।।३।।

**❋ भक्ति गीत ❋** ( चाल – जब होवे दफन )

तुझे ध्यान जडो, पाय दृष्टि पडो, हीच आशा मला ।
कथा ऐको कानी, नाम गावो वाणी, हीच आशा मला।।धृ।।

माया तुझी माझ्या भवताल सारी ।
आनंदात कोठे ही रडते बिचारी ।
भेदभाव नसो,ज्ञान दृष्टि दिसो, हीच आशा मला ।।१।।

मी पाहीन जेथे तिथे तू दिसावा ।
मी राहीन जेथे तिथे तू असावा ।
म ला सोडू नको, प्रेम तोडू नको, हीच आशा मला।।२।।

नटला जगाच्या रुपाने तू देवा ।
जनता जनार्दना; घडो तुझी सेवा ।
अभिमान गळो,काम क्रोध जळो, हीच आशा मला ।।३।।

मी सोडीन देहा तुला पाहुनीया ।
राहो तुझी सर्वदा प्रेम छाया ।
अच्युत या दीना, पाव नारायणा ! हीच आशा मला ।।४।।

## ❋ प्रार्थना श्लोक ❋

( वृत्त : शार्दुलविक्रिडित )

ध्याता भागवतास हो सुहृदयता विद्रोह जावो लया ।
गाता भागवतास सर्व जनता लाभो स्वधर्मा दया ।।
मागे भागवतास अच्युत अता चारित्र्य दे उज्वल ।
माथा भागवतास हा तुकविता होवो सदा मंगल ।।

## अंतिम शुभकामना

( छंद: अनुष्टुभ )

स्वातंत्र्य सौख्य आरोग्य, लाभो सर्वत्र या जना ।
पूर्ण काम असो सारे, दुःख थोडे नसो कुणा ।।



REFBK-0022511
REFBK-0022511
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
2380
वा. क्र. 22497
ग्रंथ शाखा

गोपालकृष्ण भगवान की जय !

# - धर्मग्रंथ प्रकाशनाचे विक्रेते -

१) धर्मग्रंथ प्रकाशन, शिवभवन-श्री क्षेत्र कौंडण्यपूर, ता. चांदूर रेल्वे, जि. अमरावती ( विदर्भ )
२) श्रीमान बाबुसाहेब हेडा-वऱ्हा, ता. चांदूर रेल्वे, जिल्हा अमरावती.
३) श्री. सितारामजी बोडखे-शेंदूरजना बाजार, ता. चांदूर रेल्वे, जि. अमरावती
४) श्री. मधुकर दाजीबा ताजनेकर-पेंटर, आर्वी, जि. वर्धा.
५) नवयुग बुक स्टॉल-राजकमल चौक, अमरावती ( विदर्भ )
६) श्री. नरहर गोविंद वाईकर-अंबापेठ, अमरावती ( विदर्भ )
७) श्री. चावंडे वॉचमेकर-सरोज चौक, अमरावती ( विदर्भ )
८) श्री. विठ्ठल गोविंद जोशी ( तिवसकर ) - सुभाष प्रेस, तपोवन-अमरावती ( विदर्भ )
९) श्री. मधुकर लक्ष्मण पांडे-गोपाल टॉकीजचे मागे, राजापेठ, जि. अमरावती ( विदर्भ )
१०) श्री. गोपाळराव सूतकर-खोलापूर, जि. अमरावती ( विदर्भ )
११) श्री. डॉ. मोकासदार-दर्यापूर, जि. अमरावती ( विदर्भ )
१२) श्री. छत्रपती राजारामजी टाकरखेडे-वरुड, ता. मोर्शी, जि. अमरावती ( विदर्भ )
१३) श्री. लक्ष्मणराव उजवणे-हिंगणघाट, जि. वर्धा.
१४) श्री. बाबासाहेब देशमुख-मुक्तापूर, ता. काटोल, जि. नागपूर.
१५) श्री. भैय्यासाहेब किन्हीकर-भांब ( देवी ) जि. अकोला.
१६) श्री. केशवराव शिरोळे-घाटंजी, ता. केळापूर, जि. यवतमाळ.
१७) श्री. आप्पाजी उत्तरवार-पांढरकवडा, जि. यवतमाळ.
१८) श्री. बाळासाहेब वकील-करकरे प्लॉट, परतवाडा, जि. अमरावती.
१९) श्री. बस्वलिंग अय्या गुरुराज अय्या-नेरपिंगळाई, ता. मोर्शी जि. अमरावती ( विदर्भ )
२०) श्री. राजाभाऊ लक्ष्मणराव ( वकील )-मु. वरुड, ता. मोर्शी, जि. अमरावती ( विदर्भ )
२१) श्री. समर्थ रामजीबाबा संस्थान-मु. पो. ता. मोर्शी, जि. अमरावती.
२२) श्री. श्री. भ. पाटील-कोल्हटकरवाडी, वाशीम, जि. अकोला.
२३) श्री. सूर्यकांत तळेकर-पाथरी, जि. परभणी ( मराठवाडा )
२४) श्री. डॉ. राम लाखे-राजुरा, जि. चंद्रपूर.

श्री संत अच्युत महाराज यांची प्रकाशित धार्मिक पुस्तके

## विक्रीस तयार

| | | |
|---|---|---|
| १. श्री क्षेत्र कौंडण्यपूर क्षेत्र परिचय व माहात्म्य | ( गद्य ) | ००-५० |
| २. श्री पंचधारा स्तोत्र | मराठी ओवीबध्द | ००-२० |
| ३. श्री चंद्राजी माहात्म्य | ,, ,, | ००-३५ |
| ४. श्री तात्याजी महाराज चरित्र | ,, ,, | ००-२५ |
| ५. श्रीमत् भगवत्गीता | ,, ,, | ०१-०० |
| ६. श्री संत मायबाई चरित्र | ,, ,, | ००-५० |
| ७. श्री दुर्गा सप्तशति | ,, ,, | ०१-५० |
| ८. श्रीमत् भागवत् पुराण | ,, ,, | १८-०० |
| ९ श्री स्वामी रामानंद कथामृत | ,, ,, | ००-६० |
| १०. श्री महाभारत ( पाच खंडात ) | ,, ,, (प्रत्येकी) | २०-०० |
| ११. श्री सत्यनारायण व्रतकथा | ,, ,, | ००-५० |
| १२. श्री कौंडण्यपूर माहात्म्य हिंदी | | ००-४० |
| १३. स्वानुभव भजनमाला १ | हिंदी व मराठी | ००-५० |
| १४. स्वानुभव भजनमाला २ | ,, ,, | ००-६५ |
| १५. स्वानुभव भजनमाला ३ | ,, ,, | ००-८० |
| १६. श्री अंबिकोपासना | | ००-०५ |
| १७. श्री गणेश-उपासना | | ००-०५ |
| १८. श्रीमत् भागवत् आराधना | | ००-०१ |
| १९. श्री महाभारत-आराधना | | ००-०५ |
| २०. श्री रामोपासना | | ००-०५ |
| २१. श्री नृसिहोपासना | | ००-०५ |
| २२. श्री ब्रम्हचारी महाराज चरित्र | | ०२-०० |
| २३ श्री गीत भागवत | | ०१-०० |
| २४. वंद. अच्युत महाराजांचे शुभ स्तवन | | ००-१० |

– पुस्तके मिळण्याची प्रमुख ठिकाणे –

१) धर्मग्रंथ प्रकाशन; शिवभवन - श्री क्षेत्र कौंडण्यपूर
ता. चांदूर रेल्वे, जि. अमरावती (विदर्भ)

२) व्यव. सुभाष मुद्रणालय, तपोवन-अमरावती (विदर्भ)